# हवेच्या गुणवत्तेत सुधारणा

## फेब्रुवारीतील आकडेवारीचे विश्लेषण; मुंबईत प्रदूषकांच्या पातळीत घट

**म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईच्या हवेच्या गुणवत्तेत फेब्रुवारीमध्ये समाधानकारक सुधारणा झाल्याची नोंद झाली असून गेल्या वर्षीच्या तुलनेत पीएम १० आणि पीएम २.५ या प्रदूषकांच्या पातळीत घट झाली आहे.

देशातील महत्त्वाच्या १० शहरांमध्ये फेब्रुवारी २०२३च्या तुलनेत फेब्रुवारी २०२४ मधील पीएम १०चा निर्देशांक कमी होता असेही समोर आले आहे. पुण्याच्या रेस्पायरर लिव्हिंग सायन्सेस या संस्थेच्या माध्यमातून हे विश्लेषण करण्यात आले आहे.

फेब्रुवारी २०२४मध्ये मुंबईमधील पीएम १०च्या उपलब्ध माहितीनुसार २९ दिवसांपैकी सात दिवस हवेची गुणवत्ता समाधानकारक असल्याची नोंद झाली. तर उरलेले २२ दिवस हवा मध्यम श्रेणीमध्ये होती. थंडीच्या महिन्यांमध्ये मुंबईच्या हवेतील प्रदूषण पातळी वाढलेली असते. मात्र यंदा फेब्रुवारी महिन्यामध्ये या प्रदूषणापासून मुंबईकरांना दिलासा मिळाल्याचे आकडेवारीवरून समोर आले आहे. फेब्रुवारी २०२३मध्ये पीएम १०ची सरासरी १७७.९ नोंदली गेली तर फेब्रुवारी २०२४मध्ये ही सरासरी ११६.८ नोंदली गेली.

मुंबईमध्ये ३४.३ टक्क्यांनी पीएम १०च्या प्रदूषणाच्या सरासरीमध्ये घट झाल्याची नोंद झाली. देशातील सर्वात महत्त्वाच्या १० शहरांपैकी मुंबईतील पीएम १०च्या पातळीत झालेली घट ही सर्वाधिक असल्याचेही समोर आले. मुंबईतील पीएम २.५च्या निर्देशांक फेब्रुवारी २०२४मध्ये चांगला असल्याचीही नोंद झाली. मुंबईतील पीएम २.५चा निर्देशांक पाच दिवस चांगला तर, १८ दिवस समाधानकारक नोंदला गेला आहे. गेल्या वर्षीच्या पीएम २.५च्या फेब्रुवारीच्या सरासरी निर्देशांकाच्या तुलनेत यंदाच्या फेब्रुवारीमध्ये ४३.१ टक्के सुधारणा झाल्याचे नोंदले गेले आहे. गेल्या वर्षी हा सरासरी निर्देशांक ८५.४ होता तर यंदाच्या फेब्रुवारीमध्ये हा निर्देशांक ४८.६ होता.

मुंबईच्या हवेमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत झालेली ही सुधारणा कशाचे कारण आहे, याचे विश्लेषण या आकडेवारीच्या पार्श्वभूमीवर आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. मुंबईमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कमी थंडी होती. याचा परिणाम मुंबईच्या हवेच्या गुणवत्ता निर्देशांकावर झाला आहे का, याचे विश्लेषण अपेक्षित असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. वाऱ्याची दिशा, वाऱ्याचा वेग आणि मुंबईचे तापमान या पार्श्वभूमीवर मुंबईच्या निर्देशांकाचे विश्लेषण झाल्यास त्याचा मुंबईच्या हवेच्या आरोग्यासाठी अधिक फायदा होऊ शकतो तसेच त्यामुळे योग्य उपाययोजना राबवता येऊ शकतील, अशीही अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### १५५ शहरांमधील पीएम १०चा निर्देशांक निर्धारित राष्ट्रीय निकषांपेक्षा अधिक

देशभरातील राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रमानुसार नोंदल्या जाणाऱ्या २७० शहरांच्या हवेच्या गुणवत्ता निर्देशांकापैकी १५५ शहरांमधील पीएम १०चा निर्देशांक हे निर्धारित राष्ट्रीय प्रमाण निकषांपेक्षा अधिक असल्याचे समोर आले आहे. तर २५८ शहरांच्या पीएम १० या प्रदूषकाचे निर्देशांक जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाण निकषांपेक्षा अधिक होते. २७० शहरांपैकी ९५ शहरांमध्ये पीएम २.५ या प्रदूषकाची निर्देशांक पातळी राष्ट्रीय प्रमाण निकषांपेक्षा जास्त होती तर जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रमाण निकषांपेक्षा २६९ शहरांमधील पीएम २.५ च्या निर्देशांकाची पातळी अधिक होती.